# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# कष्ट केल्याशिवाय फळ मिळत नाही:प्रा.कोंडीबा शिंदे

पाटण/प्रकाश कांबळे:-

स्पर्धेच्या युगात आपल्याला टिकावयाचे असेल तर आपण सातत्याने कष्ट केलेच पाहिजे कष्टाशिवाय फळ मिळत नाही असे मत राष्ट्रीय सेवा योजनेचे सातारा जिल्हा समन्वयक प्रा. कोंडीबा शिंदे यांनी व्यक्त केले ते बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणच्या राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे ढोरोशीच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्ष म्हणून कोयना एज्युकेशन सोसायटीचे सदस्य शरद देशमुख हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून कोयना एज्युकेशनचे सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण, बा. दे. कॉलेजचे प्र.प्राचार्य डॉ. व्ही.ए. कळंत्रे, ढोरोशी गावच्या उपसरपंच सौ. सुवर्णा मगर, डॉ. आर.टी. सपकाळ टी.सी. कॉलेज, बारामती हे होते.




कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटणचे बा.दे. कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबीर मौजे ढोरोशी याठिकाणी उद्घाटन पार पडले. सुरुवातीला एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. लक्ष्मण गणगे यांनी प्रास्ताविक केले. त्यामध्ये त्यांनी दि. २१/१२/२०२५ ते ०४/०१/२०२६ या कालावधीमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तर जुनियर विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.बजरंग चव्हाण यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर प्रा.शिंदे पुढे म्हणाले की, जीवन जगत असताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागत असते प्रतिकूल परिस्थितीत मात करण्याची क्षमता महाविद्यालयीन जीवनामध्येच प्रत्येकाच्या जीवनात निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी अशा प्रकारचे श्रमसंस्कार शिबिरे आपण आयोजित करणे आणि त्यामध्ये सहभागी होणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. कोयना एज्युकेशन सोसायटीचे संचालक संजीव चव्हाण म्हणाले की, श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून आपल्याला जीवनाचे धडे मिळत असतात येणाऱ्या परिस्थितीत तडजोड कशी करावी याचे धडे आपल्याला गिरविता येऊ शकतात आणि त्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

अध्यक्षीय मनोगतात शरद देशमुख म्हणाले की, 'एनएसएस'च्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास आणि आत्मविश्वास वाढतो. आपण सर्वांनी अशा प्रकारच्या शिबिरामध्ये सहभागी झाली पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या विविध श्रमसंस्कार शिबिरातून युवकांचा व समाजाचा विकास होतो. असे मत त्यांनी व्यक्त केले.

उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सौ.एस.एस.कुंभार यांनी केले तर आभार वरिष्ठ कार्यक्रम अधिकारी डॉ. भरत जाधव यांनी मानले. कार्यक्रमास शामराव मगर, अण्णा पुजारी ग्रामपंचायत सदस्य ढोरोशी, पोलीस पाटील राहुल पुजारी, प्रतापसिंहराजे भोसले हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अनिल मोहिते, एन.एस.एस. सदस्य प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. विशाल कांबळे यांच्यासह ज्यूनियर व सीनियर विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते